# सत्यशोधक चळवळीत बहुजनांच्या योगदानाचा उल्लेख नसणे खेदजनक

**-हरी नरके**

*कोल्हापूर, दि. २ (प्रतिनिधी)*

महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांनी स्त्री हक्काच्या संदर्भात मुलभूत गाभ्याला हात घालणारे विचार मांडले हे. त्यांचे या चळवळीतील मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध संशोधक हरि नरके यांनी केले.

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठाचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत 'सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचे योगदान' या विषयावर श्री. नरके बोलत होते.

यावेळी बोलताना श्री. नरके पुढे म्हणाले, म. फुले व सावित्रीबाई फुले यांनी ज्या काळात स्त्रियांसाठी शिक्षणाचे कार्य करायला सुरुवात केली तो काळ स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल होता. त्याकाळातील समाजधुरिणांचाही स्त्री शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन नकारात्मक होता. अशा काळात १७ वर्षांच्या सावित्रीबाई व २१ वर्षांच्या जोतिरावांनी काम करायला सुरूवात केली. या कार्यात त्यांना ज्या ब्राम्हणांनी मदत केली त्यांचा उल्लेख आजवरच्या इतिहास संशोधकांनी केला आहे मात्र बहुजन समाजातील ज्या लोकांचे या चळवळीत, या कार्यात मोलाचे योगदान होते त्यांचा मात्र कुठेही उल्लेख आलेला नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

संपूर्ण भारतातील पहिली महिला संपादक तानुबाई बिर्जे ही सुद्धा सत्यशोधक चळवळीतच तयार झाली. १९०६ ते १२ या कालावधीत त्यांनी दिनबंधू हे नियतकालिक चालविले. स्त्री विषयक विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी अत्यंत खडतर परिस्थितीत केले. म. फुलेंना ठार मारण्याची सुपारी घेऊन त्यांना मारण्यासाठी आलेल्या धोंडिबा रोडेची सून सावित्रीबाई रोडे ही १९२५ साली सत्यशोधक समाजाची पहिली स्त्री महिला अध्यक्ष झाली. लक्ष्मीबाई नवलू यांनी आपल्या पतीच्या निधनानंतर भालेकर नावाचे नियतकालिक चालविले होते. १९२५ साली त्यांनी घेतलेल्या सत्यशोधक महिला परिषद घेतली त्यात त्यांनी स्त्री हक्काच्या संदर्भात जे ठराव केले तेच आजही केले जात आहेत. म. फुलेंनी सुरू केलेल्या सत्यशोधक विवाह पद्धतीनुसार विवाह लावून देण्याचे काम सावित्रीबाई करेकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केले.

अत्यंत परखडपणा, निर्भिडपणा व थेट आव्हानाला भिडणे हे फुले पती-पत्नीचे




कै. व्ही. टी. पाटील यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान मालेत बोलताना प्रसिद्ध संशोधक हरी नरके. (छाया - राजा उपळेकर)

सत्यशोधक चळवळीला लाभलेले फार मोठे योगदान होते. त्यांच्या पठडीत तयार झालेल्या या स्त्रियांचे कार्य म्हणूनच वरवरचे किंवा पोकळ नव्हते, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन जयसिंग सावंत यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. श. कृ. कणबरकर यांनी केला तर आभारप्रदर्शन डॉ. जे. बी. शिंदे यांनी केले.